CMYK

दिग्रस येथे ईद-ए-मिलादनिमित्त अफाट जनसागर >> पान 2

श्री गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मनपा सज्ज >> पान 3

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित दादा पवार १९ सप्टेंबरला बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर >> पान 4

सुविचार

तुम्ही प्रत्येक वेळेस नवीन चूक करत असाल तर नक्कीच समजा तुमची प्रगती होत आहे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

विराट कोहलीच्या रॉकेट शॉटने मोडली स्टेडियमची भिंत, जोरदार सिक्स पाहून प्रेक्षक हैराण

आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 41 ■ मंगळवार, दि. 17 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# धनगर, धनगड एकच, लवकरच जीआर काढणार

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीनंतर सरकारचा निर्णय



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : धनगड आणि धनगर एकच आहेत, असा जीआर काढण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीनंतर शंभूराज देसाईंनी ही माहिती दिली आहे. पंढरपूर येथे धनगर समाजाच्या वतीनं सुरू असलेल्या आमरण उपोषणावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि धनगर समाजाचं शिष्टमंडळाची बैठक पार पडली. धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची प्रमुख मागणी आहे. धनगर आरक्षणासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. बैठकीनंतर उपोषण मागे घेण्याचं शिष्टमंडळानं आश्वासन दिलं आहे.**

राज्य सरकारकडून मोठा निर्णय घेत, धनगर आणि धनगड एकच आहे, असा जीआर लवकरच काढला जाईल, असं आश्र्वासन देण्यात आलं आहे. हा जीआर कायद्याच्या कसोटीवर न्यायालयात टिकला पाहिजे, त्यासाठी जीआरचा मसुदा तयार करण्याचं काम केलं जाणार आहे. यासाठी दोन वरिष्ठ सनदी अधिकारी आणि सखल धनगर समाजाच्या पाच प्रतिनिधींची समिती स्थापन केली जाणार आहे. राज्य सरकारकडून नेमली जाणारी समिती पुढच्या चार दिवसांत जीआरचा मसुदा तयार करेल. त्यानंतर राज्याच्या महाधिवक्त्यांचं देखील यासंदर्भात मत घेतलं जाईल, असा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यासंदर्भात बोलताना म्हणाले की, धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यासाठी सकारात्मक पावलं उचलली जातील. हा समावेश कायद्याच्या चौकटीत टिकणारा आणि अन्य कुठल्याही समाजावर अन्याय करणारा नसेल असे प्रयत्न केले जातील. तसेच, यासंदर्भात उत्पादन शुल्क मंत्री शुंभूराज देसाई यांनीदेखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, धनगर आणि धनगड एकच आहेत, असा स्वतंत्र जीआर सरकारनं काढावा, अशी मागणी धनगर समाजाची होती. तसा जीआर काढण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. हा जीआर न्यायालयात टिकेल याची काळजी घेतली जाईल.




## धनगर–धनगड जीआर काढण्याच्या निर्णयाला विधानसभा उपाध्यक्षांचा विरोध

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** राज्य सरकारकडून धनगड आणि धनगर एकच आहेत, असा जीआर काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काल मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर शंभूराज देसाईंनी याबाबत माहिती दिली आहे. आता राज्य सरकारच्या या निर्णयाला महायुतीतूनच विरोध झाल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विधानसभा उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवाळ यांनी राज्य सरकारच्या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. आदिवासींमधून आरक्षण देण्याचा अट्टाहास का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. नरहरी झिरवाळ म्हणाले की, वर्षानुवर्षे हा विषय सुरू आहे. धनगर समाजाला आरक्षण द्यावे यावर आमचे दुमत नाही. पण आमच्यातून देऊ नये. माझी सरकारला विनंती आहे की, जसे त्यांना बोलावले जाते तसं आम्हालाही बोलवावे. आमचे नेते आहेत, मंत्री आहेत, त्यांना बैठकीला बोलवायला हवे होते, असे म्हणत त्यांनी विरोध दर्शवला आहे.

ते पुढे म्हणाले की, मी विधानसभा उपाध्यक्ष असल्याने समाजाचे माझ्याकडे लक्ष आहे. आदिवासींच्या धर्तीवर आरक्षण देऊ असे म्हटले होते. पण आदिवासींमधूनच आरक्षण देण्याचा अट्टहास का? सरकारच्या निर्णयाविरोधात आदिवासी आमदार, नेते, संघटना सर्व एकत्र येतील. आम्ही सर्व आदिवासी नेत्यांची बैठक घेऊन पुढील भूमिका स्पष्ट करणार आहोत. विरोध करायचा की न्याय मागायचा? हा निर्णय घेतला जाणार आहे. धनगर आरक्षणाच्या मुद्यांवर



आम्ही आजही राजीनाम्यावर ठाम आहोत. आम्ही लवकर पुढची भूमिका स्पष्ट करणार असे नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. आता थेट विधानसभा उपाध्यक्षांनीच राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला विरोध केल्याने आता राज्य सरकारवर नेमका काय निर्णय घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पंढरपूर येथे धनगर समाजाच्या वतीनं सुरू असलेल्या आमरण उपोषणावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि धनगर समाजाचं शिष्टमंडळाची बैठक पार पडली. यानंतर राज्य सरकारकडून धनगर आणि धनगड एकच आहे, असा जीआर लवकरच काढला जाईल, असं आश्र्वासन देण्यात आलं आहे. हा जीआर कायद्याच्या कसोटीवर न्यायालयात टिकला पाहिजे, त्यासाठी जीआरचा मसुदा तयार करण्याचं काम केलं जाणार आहे. यासाठी दोन वरिष्ठ सनदी अधिकारी आणि सखल धनगर समाजाच्या पाच प्रतिनिधींची समिती स्थापन केली जाणार आहे. राज्य सरकारकडून नेमली जाणारी समिती पुढच्या चार दिवसांत जीआरचा मसुदा तयार करेल. त्यानंतर राज्याच्या महाधिवक्त्यांचं देखील यासंदर्भात मत घेतलं जाईल, असा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.

## झिरवाळांनंतर अजितदादांच्या आणखी एका आमदाराचा सरकारला घरचा आहेर

दैनिक आपला विदर्भ

**अकोले/प्रतिनिधी :** राज्य सरकारकडून धनगड आणि धनगर एकच आहेत, असा जीआर काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर शंभूराज देसाईंनी याबाबत माहिती दिली. आता या निर्णयाला महायुतीच्याच नेत्यांमधून विरोध होत असल्याचे दिसून येत आहे. सुरुवातीला विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी या निर्णयाला विरोध दर्शवला. यानंतर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनीही महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावू नका. तसं झालं तर उग्र स्वरूपाचं आंदोलन केलं जाईल, असा इशाराच डॉ.किरण लहामटे यांनी महायुती सरकारला दिला आहे.

डॉ. किरण लहामटे म्हणाले की, धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याचा ज्यांनी कोणी निर्णय घेतला त्यांचा मी निषेध करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४७ जमातींना आरक्षण दिलंय आणि त्यात कोणाचाही समावेश होवू शकत नाही. घटनेची कोणी पायमल्ली करू नये. धनगर समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर स्वतंत्र द्या. धनगर आणि आदिवासी समाजाचा काही संबध नाही. त्यांची संस्कृती स्वतंत्र आहे. सरकार असं का विचार करतंय? किंवा काही संघटनांना का वाटतंय की आदिवासी समाजात आरक्षण मिळावं. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावू नका. तसं झालं तर उग्र स्वरूपाचं आंदोलन केल जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

## संजय शिरसाट यांना मंत्रीपदाचा दर्जा

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रिमंडळात स्थानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाटांची महामंडळावर वर्णी लावण्यात आली आहे. संजय शिरसाट यांची सिडकोच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तशा प्रकारचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शिंदे गटाचे संजय शिरसाट, भरत गोगावले आणि इतर काही नेते मंत्रिपदाच्या प्रतीक्षेत होते. दरम्यानच्या काळात अजित पवारांनी शरद पवारांची साथ सोडली आणि भाजपसोबत सत्तेत सामील झाले. त्यामुळे शिंदे गटाच्या वाट्याला जाणाऱ्या मंत्रिपदांच्या संख्येत आणखी एक वाटेकरी वाढला. अजित पवारांच्या नऊ मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्याने नंतरच्या काळात शिंदे गटातील इच्छुक आमदारांची संधी हुकल्याची चर्चा आहे.

गेल्या काही काळापासून राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होणार होणार अशी सातत्याने चर्चा आहे. त्यामध्ये शिंदे गटाच्या आमदारांना संधी मिळेल अशी अपेक्षा होती. पण आता विधानसभा निवडणूक अगदी तोंडावर आल्यामुळे किमान महामंडळावर तरी वर्णी लागावी यासाठी काहीजणांनी प्रयत्न सुरू केल्याची माहिती आहे. त्यातच आता हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांची हळद संशोधन केंद्राच्या अध्यक्षपदावर वर्णी लागली. तर संजय शिरसाटांची सिडकोच्या अध्यक्षपदी वर्णी लागली. त्यामुळे आगामी काळात मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता अगदी कमी असल्याचं बोललं जातंय.शिंदे गटाचे हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांचं राजकीय पुनर्वसन करण्यात आलं आहे.

## 'वंदे भारत' मेट्रो'चं नामांतरण 'नमो भारत रॅपिड रेल', रेल्वेचा मोठा निर्णय

नवी दिल्ली : वंदे भारत मेट्रो ट्रेनच्या चाचण्या आता पूर्ण झाल्या असून, पहिली वंदे भारत मेट्रो ट्रेन देशाच्या सेवेत येण्यास सज्ज झाली आहे. पहिला मान याचा गुजरातला मिळाला आहे. दरम्यान, आता वंदे भारत मेट्रोचं नाव बदललं आहे. रेल्वेने आता वंदे भारत मेट्रोचे नाव बदलून 'नमो भारत रॅपिड रेल' असं केलं आहे. त्यामुळे आज पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील पहिली नमो भारत रॅपिड रेल्वे गुजरातच्या जनतेला भेट देणार आहेत.

आज वंदे भारत मेट्रोच्या उद्घाटनापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नामकरणाचा सोहळा पार पडला. यानंतर वंदे भारत मेट्रो आता नमो भारत रॅपिड रेल अशी ओळखली जाईल. भारतात दररोज करोडो प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. दरम्यान, नमो भारत रॅपिड रेलची गुजरातला आज भेट मिळत आहे. ही नमो भारत रॅपिड रेल गुजरातमधील भुज ते अहमदाबादपर्यंत धावणार आहे. आठवड्यातून ६ दिवस ही ट्रेन चालवली जाणार आहे.



नमो भारत रॅपिड रेलचे भाडे किमान ३० रुपये आहे. यामध्ये जीएसटीचाही समावेश करण्यात आला आहे. यासोबतच ५० किलोमीटरच्या प्रवासाला ६० रुपये इतके शुल्क लागणार आहे. नमो भारत रॅपिड रेलमध्ये मासिक पास वैध असणार आहे. साधारण मेल आणि एक्स्प्रेस ट्रेन किंवा पॅसेंजर ट्रेनसाठी जारी केलेले तिकीट या ट्रेनमध्ये चालणार नाही. यासाठी वेगळे एमएसटी >> पान २

## आ. संजय गायकवाड यांच्या त्या वक्तव्यावरून राजकीय वादळ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :राहुल गांधी यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर केलेल्या वक्तव्यानंतर आता शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी खळबळजनक विधान करत राहुल गांधी यांची जीभ छाटून आणून देणाऱ्यास ११ लाख रुपयांचे बक्षीस आ. संजय गायकवाड यांनी त्यांच्या बुलढाणा येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जाहीर केले. आमदार संजय गायकवाड यांच्या या वादग्रस्त विधानानंतर पुन्हा राज्यात एकदा राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. या वादग्रस्त विधानावरून आज दि.१६ सप्टेंबर रोजी दिवसभरापासून जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात वादंग सुरु आहे. तर काँग्रेससह सर्वच विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. दरम्यान दुपारी अडीच वाजेपासून मध्य प्रदेशातून आलेले काँग्रेसचे निरीक्षक आ. चौधरी, जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, आ. धीरज लिंगाडे, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ, जयश्री शेळके यांच्यासह काँग्रेसच्या शेकडो कार्यकर्त्यांनी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला. तोपर्यंत संजय गायकवाड यांच्या विरोधात उन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत माघार न घेण्याची भूमिका काँग्रेसने घेतली. आधी पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र काँग्रेस माघार घेण्याच्या मनस्थितीत नव्हती, आम्ही पोलीस ठाण्यातच अन्न त्या आंदोलन सुरू करतो असा इशारा पक्ष निरीक्षक आ. चौधरी यांनी दिला. >> पान २

### संजय गायकवाड यांचे वक्तव्य म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा

आ. गायकवाड यांचे विधान म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असा प्रकार आहे. भाजपा आणि त्यांच्या मित्र पक्षांची भूमिका वारंवार लोकशाही आणि आरक्षण विरोधाची राहिली आहे. हे देशातील जनतेला माहीत आहे. राहुल गांधी यांनी अमेरिकेत केलेल्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात येत आहे. राहुल गांधी यांनी सातत्याने जातीय जनगणना व्हावी, अशी मागणी रेटून धरत आरक्षणाच्या समर्थनाची भूमिका घेतलेली आहे. आ.गायकवाड यांनी याआधी दलीत बांधवांच्या विरोधात काय वक्तव्य केले आहे हे मतदारसंघातील जनतेला माहित आहे. आ. संजय गायकवाड वारंवार चिथावणी खोर वक्तव्य करण्यात माहित आहे, त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्री शेळके यांनी केली आहे.

### त्यांची मस्ती विधानसभेत उतरेल

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची जिभ छाटणाऱ्यास ११ लाखांचे बक्षीस देईल, असे वादग्रस्त विधान शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केली आहे.यावर राज्याचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात त्यांनी एक व्हिडिओ टाकला आहे. यात वडेट्टीवार यांनी संजय गायकवाड औकातीबाहेर बोलत आहे, राहुल गांधी यांचे नाव घेण्याची त्याची औकात नाही. तो कुठे आणि त्याचा पक्ष कुठे आहे. येणाऱ्या विधान सभा निवडणुकीत तुमचा माज आणि मस्ती उतरेल, असे म्हणत विजय वडेट्टीवार यांनी घणाघात केला आहे. तसेच शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करावा, यासाठी काँग्रेसकडून बुलढाणा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यात आली.

CMYK

# दिग्रस येथे ईद-ए-मिलादनिमित्त अफाट जनसागर

## सर्व चौकात महाप्रसादाचे वाटप : असंख्य राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी** : दिग्रस येथे ईद-ए-मिलाद अर्थात अंतिम प्रेषित मुहम्मद सल्लम यांच्या जयंतीनिमित्त आज ता १६ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेल्या मिरवणुकीने मागील सर्व विक्रम मोडले. विविध सामाजिक-धार्मिक संघटना व कार्यकर्त्यांच्या वतीने प्रमुख मार्ग व चौकाचौकात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते. असंख्य राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थिती राहून मुस्लीम बांधवांना ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या.

दिग्रस येथील बाराभाई मोहल्ला तसेच बाबा चांदनगर येथून आज सकाळी ९ वाजता मुख्य मिरवणूका काढण्यात आल्या होत्या . सोबतच शहरातील इतर मुस्लीमबहुल भागातून काढण्यात आलेल्या मिरवणूका देखील यात सामील झाल्या. शहरातील मुख्य मार्ग व चौकातून फेरी मारत सदर मिरवणूक दुपारी एक वाजता बाराभाई मोहल्ला येथे पोहोचली. शहरे काजी मौलाना अबू जफर यांनी यावेळी विशाल जनसागराला संबोधित केले. मानवाच्या सर्व समस्यांचा समाधान अंतिम प्रेषित मुहम्मद सल्लम यांच्या शिकवणुकीत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी देशाच्या स्थैर्य, एकता व अखंडतेसाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. शहरातील विविध मस्जिदींचे इमाम व खतीब देखील मंचावर उपस्थित होते. फातेहा-ख्वानी व सलामनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी खा संजय देशमुख, उबाठा शिवसेना शहर प्रमुख राहुल देशपांडे, गोपाल शाह, माजी नगराध्यक्ष रविंद्र अरगडे, काँग्रेसचे राजेंद्रसिंह चौहान, डॉ. विठ्ठल घाटगे, भारत पाटील, केतन रत्नपारखी, पुरूषोत्तम कुडवे, हर्षल शाह, प्रज्योत अरगडेसह इतर राजकीय पुढारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मिरवणुकीत हजेरी लावून मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या. कच्छी चौकात परिक्षाविधीन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले, उपविभागीय पोलीस अधिकारी चुलुमुला रजनीकांत, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे, सर्व पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक , स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कच्छी चौकात मुस्लीम बांधवांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.



### चौकाचौकात स्वागत कमानी उभारून स्वागत

विविध सामाजिक-धार्मिक संघटना व कार्यकर्त्यांच्या वतीने प्रमुख मार्ग व चौकाचौकात स्वागत कमानी उभारून व आकर्षक सजावट करून मिरवणुकीचे स्वागत केले. अनेक ठिकाणी मिठाई, पोहा, चना, लाडू, बुंदी, शरबत, खीर, सोनपापडी, खजूर, पाणी, महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. अंतिम प्रेषित मुहम्मद सल्लम यांच्या जयंतीनिमित्त शहरातील अनेक मस्जिदींमध्ये मागील बारा दिवसापासून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले जात होते. त्याचा आज विशाल मिरवणूकीद्वारे शेवट करण्यात आला.

### विक्रमी मिरवणुकीने वेधले लक्ष

न भूतो न भविष्यती अशी विक्रमी व विशाल मिरवणूक, उंट, घोडे, आकर्षक देखावे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. माजी उपनगराध्यक्ष जावेद पटेल व सक्रिय सामाजिक कार्यकर्ते जावेद पहेलवान यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ईद-ए-मिलाद कमिटीच्या सर्व पदाधिकारी , कार्यकर्त्यांनी व समस्त मुस्लीम बांधवांनी आजच्या मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला. महाप्रसाद वाटपासाठी गफ्फार खान, सैयद मतीन, अब्दुल हादी, इरफान खान, सैयद एहफाज, मुहम्मद रफीक, सैयद शाहिद, अब्दुल नईम, जावेद खान, जमीर खान, सैयद एहफाज, सैयद शोएब, सैयद हारून व इतर मंडळीने परिश्रम घेतले.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला. तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## ''आजच तुम्हाला स्पष्ट सांगतोय, नंतर'', मनोज जरांगेंचा सरकारला इशारा; मध्यरात्रीपासून पुन्हा उपोषण!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गेल्या एक ते दीड वर्षापासून मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर कधी आंदोलन, कधी उपोषण या मार्गाने मागण्या मांडत आहेत. त्यांना मराठा समाजातून मोठा पाठिंबाही मिळत आहे. मात्र, त्यांनी केलेल्या सगळ्या मागण्या अद्याप शासनदरबारी मान्य न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. आज मध्यरात्रीपासून पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसणार असून त्याआधी आज सकाळी माध्यमांशी बोलताना त्यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे.

''आम्ही तुमच्याकडे ९ ते १० मागण्या दिल्या आहेत. त्याची तातडीने अंमलबजावणी करा. त्यात कोणतीही अडवणूक देवेंद्र फडणवीसांनी करू नये. ज्या कुणाला सत्तेची खूप मस्ती आहे, त्यांना आज स्पष्टच सांगतोय. आमच्या नावानं नंतर तक्रार करू नका. तुम्हाला आत्ताच संधी आहे. मला यात राजकारण करायचं नाहीये. मला किंवा माझ्या समाजाला राजकारणात जायचं नाहीये. पण आता तुम्ही निर्णय घेतला नाही, तर नंतर आमच्या नावानं आरडाओरड करायची नाही. तुम्हाला संधी म्हणून मी हे उपोषण करणार आहे'', असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.



''तुम्हाला जर वाटत असेल की आम्ही राजकारण करू नये किंवा आमच्यामुळे कुणाचा फायदा होऊ नये तर आमच्या मागण्या मान्य करा. नाहीतर नंतर आमच्या नावानं तक्रार करायची नाही'', असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

दरम्यान, आपल्या मागण्यांचा पुनरुच्चार करताना सगेसोयऱ्यांची आपल्या व्याख्येनुसार अंमलबजावणी केली जावी, असं ते म्हणाले. ''सातारा संस्थान, बॉम्बे गव्हर्नमेंट हे तिन्ही लागू करणं आवश्यक आहे. त्याशिवाय, सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी आमच्या व्याख्येप्रमाणे होणं गरजेचं आहे. तेही आचारसंहिता लागू होण्याच्या आत. मागेल त्या मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतही निर्णय व्हायला हवा. हे शब्द त्यांचे आहेत, माझे नाहीत. मराठा व कुणबी एकच आहेत. दोन्ही ८३ क्रमांकालाच आहेत. त्यामुळे सरकारनं याची तातडीनं अंमलबजावणी करायला हवी'', असं ते म्हणाले.

''आंदोलनात फूट पाडणं हे त्यांचं कामच आहे. आजही त्यांचं षडयंत्र चालूच आहे. पण मला आजपासून त्यावर बोलायचं नाहीये. मी सरकारला पुन्हा संधी देतोय की मला आणि माझ्या समाजाला राजकारणाकडे जायचं नाहीये. आमचं ध्येय आहे मराठा आरक्षण. राज्यातला सगळा मराठा समाज कुणबी आहे. याला शेकडो पुरावे उपलब्ध आहेत. तिन्ही गॅजेट तातडीनं लागू करा. सरसकट गुन्हे मागे घेणं, बलिदान गेलेल्या कुटुंबाला सरकारी नोकऱ्या या आमच्या मागण्या आधीच त्यांना दिल्या आहेत'', असं जरांगे पाटील यांनी नमूद केलं.

## ठाणे हादरलं! हत्येनंतर तरुणाचं मुंडकं छाटलं, मृतदेहाशेजारीच ठेवलं, खळबळजनक घटना

दैनिक आपला विदर्भ

ठाणे/प्रतिनिधी : ठाण्यात ३५ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडलीय. हत्येनंतर मुंडके छाटून ते मृतदेहा शेजारीच ठेवण्यात आलं होतं. इमारतीच्या टेरेसवर ही हत्या करण्यात आली. घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता आणि मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत. याबाबत मिळालेली माहिती अशी की, ठाण्यातील एका हायप्रोफाइल सोसायटीत हत्येची घटना समोर आलीय. हत्येनंतर ३५ वर्षीय तरुणाचं मुंडकं छाटण्यात आलंय. सोमनाथ सातगिरे असं हत्या करण्यात आलेल्या तरुणाचं नाव आहे. तो सोसायटीत मुख्य सुरक्षा अधिकारी होता. या प्रकरणी पोलिसांना त्याच्याच साथीदारावर संशय आहे.

सोमनाथ हा सोसायटीत मुख्य सुरक्षा अधिकारी होता. त्याच्याच साथीदाराने ही हत्या केली असावी असा पोलिसांना संशय आहे. प्रशांत कदम या तरुणाने हत्या केली असावी असा कयास लावला जात आहे. दरम्याना, हत्येचं कारण समोर आलेलं नाही. या घटनेने ठाण्यात खळबळ उडाली आहे.

पान १ वरून...

### 'वंदे भारत' मेट्रो'चं नामांतरण

तिकीट जारी केले जाईल. साप्ताहिक आणि मासिक तिकीट उपलब्ध असेल. प्रवाशांना सात दिवस, १५ दिवस, २० दिवसांच्या एकेरी प्रवासाचे शुल्क भरावे लागणार आहे.

पहिल्या नमो भारत
रॅपिड रेलची वैशिष्ट्ये काय?

नमो भारत रॅपिड रेल ही वंदे भारत ट्रेनसारखीच असणार आहे. मात्र उपनगरीय मेट्रो प्रणालीची वैशिष्ट्ये आणि सोयी सुविधा या ट्रेनमध्ये देण्यात आल्या आहेत. दोन्ही बाजूला इंजिन तसेच स्वयंचलित दरवाजे या नमो भारत रॅपिड रेलमध्ये असणार आहेत. पहिली नमो भारत रॅपिड रेल १० डब्यांची असणार आहे. वंदे भारत आणि नमो भारत रॅपिड रेलमधील प्रमुख फरक हा आहे की, ही ट्रेन पूर्णपणे अनारक्षित असेल. ही ट्रेन सुटण्याच्या वेळेपूर्वी प्रवासी काउंटरवर तिकीट खरेदी करू शकतात. मंत्रालयाच्या चेन्नई येथील आयसीएफमध्ये नमो भारत रॅपिड रेलचे रेक रेल्वे बनवले आहेत.

### आ. संजय गायकवाड यांच्या

त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांनी आ. गायकवाड यांचे विरोधात दखलपात्र गुन्हा दाखल केला. एफआयआर हाती आल्यानंतरच काँग्रेसने ठिय्या आंदोलन मागे घेतले.आ. संजय गायकवाड यांच्या विरोधात ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष समाधान दामंधर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आ. गायकवाड यांच्या विरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विराट कोहलीच्या रॉकेट शॉटने मोडली स्टेडियमची भिंत, जोरदार सिक्स पाहून प्रेक्षक हैराण

नवी दिल्ली : भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यात टेस्ट दोन सामन्यांची टेस्ट सीरिज खेळवली जाणार असून यातील पहिला सामना हा १९ सप्टेंबर रोजी पार पडणार आहे. चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर होणाऱ्या या सामन्यासाठी टीम इंडियाचा संघ सरावा करता येथे पोहोचला आहे. रोहित शर्मा विराट कोहली सारखे दिग्गज बांगलादेशला टेस्ट सीरिजमध्ये धूळ चारण्यासाठी सरावा दरम्यान घाम गाळत असून विराट कोहलीने या दरम्यान ठोकलेल्या एका सिक्समुळे स्टेडियमच्या भिंतीला भोक पडल्याचे पाहायला मिळाले.

सरावादरम्यान विराट कोहलीने रविवारी चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवरील भिंतीला भोक पडले. बांगलादेश विरुद्ध पहिल्या टेस्ट सामन्यासाठी विराट फलंदाजीचा सराव करत होता. त्याच्या बॅटमधून एकापेक्षा एक शॉट निघत होते. मात्र याचवेळी विराटच्या बॅटमधून निघालेला एक दमदार शॉट थेट स्टेडियम वरील ड्रेसिंग रूमच्या दिशेने गेला आणि जवळील भिंतीला जाऊन आदळला. विराटने मारलेला हा सिक्स इतका जोरदार होता की ड्रेसिंग रूम जवळील भिंतीला भोक पडून तो बॉल पार गेला. विराट कोहली जवळपास अनेक महिन्यांनी टेस्ट क्रिकेट खेळण्यासाठी उतरणार आहे. यापूर्वी जानेवारीमध्ये साऊथ आफ्रिकेविरुद्ध टेस्ट सिरीज टीम इंडियाने खेळली होती, परंतु विराटने वैयक्तिक कारणामुळे यातून माघार घेतली होती.

भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यात आतापर्यंत झालेल्या टेस्ट सीरिजमध्ये बांगलादेश एकही सीरिज जिंकू शकलेली नाही. असं असलं तरी टीम इंडिया बांगलादेशला हलक्यात घेण्याची चूक करणार नाही. कारण बांगलादेशने नुकतंच पाकिस्तानला त्यांच्याच होम ग्राउंडवर खेळवण्यात आलेल्या टेस्ट सीरिजमध्ये पराभूत केलं आहे.

# मुंबईतील काँग्रेसचा बडा नेता फडणवीसांच्या घरी गणपतीच्या दर्शनाला, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्यादृष्टीने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शह आणि काटशहाचे राजकारण सुरु झाले असताना मुंबईतून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुंबादेवी विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस आमदार अमीन पटेल हे सोमवारी सकाळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी गणपतीच्या दर्शनाला पोहोचले. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसचे मिलिंद देवरा, बाबा सिद्दीकी आणि संजय निरुपम हे नेते महायुतीमध्ये सामील झाले होते. त्यामुळे अमीन पटेल हे देवेंद्र फडणवीस यांच्या घरी पोहोचताच विधानसभेपूर्वी तेदेखील काँग्रेस पक्षाला अलविदा करणार का, अशी चर्चा रंगू लागली होती.

या सगळ्या चर्चेनंतर अमीन पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, मी देवेंद्र फडणवीस यांच्या घरी दोन कारणांसाठी गेलो होतो. एक म्हणजे मी त्यांच्या घरातील गणपतीचे दर्शन घेतले.







दुसरे म्हणजे १८ तारखेला ईद-ए-मिलादू नबी आहे, गणपती विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी जे जुलूस काढण्यात येणार आहेत, त्याची परवानगी लोकांना हवी आहे. त्याबाबत पोलिसांकडून सहकार्य मिळावे, ही मागणी मी देवेंद्र फडणवीसांकडे केल्याचे अमीन पटेल यांनी सांगितले.

अमीन पटेल आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीबाबत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीस फक्त गणपती दर्शनासाठी अमिन पटेल यांच्या घरी गेले होते. यात नवीन आणि राजकारणासारखे काही नाही. काल शरद पवार साहेब हे अमरीश पटेल यांच्या प्रायव्हेट हेलिपॅडला उतरले. ही तर महाराष्ट्राची संस्कृती आहे. अतिथी आला की पुष्पगुच्छ द्यावा लागतो. मात्र, काल अमरीश पटेल हे हाती तुतारी धरणार, अशा बातम्या चालवण्यात आल्या. त्या योग्य नाहीत, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा २१ तारखेला जळगाव जिल्ह्यात दाखल होणार आहे. यावेळी भाजपचे जळगाव जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप खोडपे हे शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. दिलीप खोडपे हे गिरीश महाजन यांच्याविरोधात जामनेर विधानसभा लढवणार असल्याचे समजते. त्यामुळे शरद पवार यांनी भाजपच्या संकटमोचकाला घेरण्याची तयारी सुरु केल्याची चर्चा आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### दुचाकीच्या अपघातात इसम जागेवरच ठार बाभूळगाव आलेगाव मार्गावरील घटना

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख



**पातूर :** पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत बाभुळगाव आलेगाव मार्गावरील विवरा फाट्यावर दूचाकीच्या अपघातात इसम जागेवरच ठार झाल्याची घटना रविवार दि.१५ सप्टेंबर रोजीच्या रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली, बाळू भगवान दामोदर रा. व्याळा ता. बाळापूर असे ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मृतक बाळू दामोदर व्याळा येथून एम एच ३० बी एस १३८० क्रमांकाच्या पल्सर दुचाकीने आलेगाव येथे बहिणीच्या घरी जात असताना दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकीसह ते रस्त्याच्या कडेला मृत अवस्थेत असल्याचे विवरा येथील प्रशांत देशमुख रस्त्याने जात असताना त्यांच्या निदर्शनास आल्याने सदर घटना उघडकीस आली, या घटनेची माहिती मिळताच पातुर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून मृतदेह व घटनेचा पंचनामा केला मृतदह उत्तरीय तपासणीसाठी सर्वोपचार अकोला येथे पाठविण्यात आले असून, पुढील तपास पातूर पोलीस करीत आहे.

### विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी घेतली सकल धनगर समाजाच्या उपोषणकर्त्यांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** धनगर समाजाची एसटी प्रवर्गामध्ये अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी गेली आठ दिवसांपासून सकल धनगर समाजाच्या प्रतिनिधींचे टिळक स्मारक, पंढरपूर येथे आमरण उपोषण सुरू आहे. डॉ. पुलकुंडवार यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी त्यांच्या समवेत निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे उपस्थित होते.
दि.१५ सप्टेंबर २०२४ रोजी सह्याद्री अतिथी गृहावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत सकल धनगर समाजाच्या प्रतिनिंधी सोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आलेले मा. मुख्यमंत्री यांची स्वाक्षरी असलेल्या निर्णयाची प्रत विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांनी उपोषणस्थळी सविस्तर वाचून दाखवली. सदर प्रत उपोषणकर्त्यांना देण्यात आली. समाजासाठी आपण सुदृढ आणि व्यवस्थित राहणं गरजेचं असून, उपोषणकर्ते यांना उपोषण सोडण्याची विनंती त्यांनी यावेळी केली. त्याचबरोबर आमदार गोपीचंद पडळकर, माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनीही बैठकीत झालेल्या निर्णयाबाबतची माहिती यावेळी दिली.

### निर्बंधाला कंटाळून मुलीनेच दिली आईच्या हत्येची सुपारी



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** बाहेर फिरण्यास आणि मोबाईल वापरावर निर्बंध टाकत असल्याने मुलीनेच आपल्या मानलेल्या भावाला सुपारी देत हत्या केल्याची धक्कादायक घटना पनवेल मध्ये घडलेय. प्रिया नाईक असे मृत महिलेचे नाव असून त्यांची गळा आवळून हत्या करण्यात आलेय. प्रिया यांची मुलगी प्रणिता ही विवाहित असून मागील २ वर्षांपासून पती सोबत पटत नसल्याने ती आईकडेच राहत होती. यावेळी बाहेर फिरण्यावर आणि मोबाईल वापरावर आईने निर्बंध आणल्याने यातून सुटका मिळवण्यासाठी तिने आपल्या मानलेला भाऊ विवेक पाटील याला १० लाख रुपयांची सुपारी दिली होती. विवेक ने आपला मित्र निशांतच्या मदतीने प्रिया यांची हत्या केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस तपासात विवेक आणि निशांत ला ताब्यात घेतले असता ही धक्कादायक माहिती समोर आली. याप्रकरणी मुलगी प्रणिता, विवेक पाटील आणि निशांत पांडे या तिघांना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास करण्यात येत आहे.

# श्री गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मनपा सज्ज

## शहर नियंत्रण समिती अंतर्गत १०० हुन अधिकारी कर्मचारी कार्यरत
## प्रियदर्शिनी चौक ते जटपुरा गेट परिसरात दुकाने लावण्यास मनाई

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** शहरात १७ सप्टेंबर अनंत चतुर्दशी रोजी होणारा श्रीगणेश विसर्जन सोहळा सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने चंद्रपूर महानगरपालिकेचे १०० हुन अधिकारी कर्मचारी आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात कार्यरत आहेत. विसर्जनाच्या दिवशी गर्दी नियंत्रणाच्या दृष्टीने प्रियदर्शिनी चौक ते जटपुरा गेट,जिल्हा परिषदेच्या एका बाजुस विसर्जनाच्या दिवशी दुकाने लावण्यास प्रशासनद्वारे मनाई करण्यात आली आहे.

विसर्जन सुरळीत होण्याच्या दृष्टीने बांधकाम विभागाद्वारे शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जनासाठी जाण्याचा मार्गांची माहीती घेऊन पावसामुळे निर्माण झालेले खड्डे भरून काढण्यात आले आहेत. मार्गावरील दुभाजकांचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. विसर्जन मिरवणुकीचा मार्ग तसेच वाहतुक व्यवस्थेची माहिती नागरीकांपर्यंत पोहचविली जात आहे. मिरवणुकी दरम्यान अनुचित घटना घडु नये याकरीता विसर्जन मार्गांवर विविध ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत.

विद्युत विभागामार्फत सर्व कृत्रिम तलाव, जटपुरा गेट, मुख्य मार्ग, विसर्जन मार्ग, विसर्जन स्थळ तसेच संपूर्ण शहरात आवश्यक त्या ठिकाणी पुरेशी लाईट व्यवस्था तसेच जनरेटरची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. आरोग्य विभागामार्फत आरोग्य पथकाच्या चमु वैद्यकीय सेवा देण्यास पूर्ण वेळ विसर्जनस्थळी राहणार असुन गांधी चौक, जटपुरा गेट व विसर्जन स्थळी अँब्युलन्सची व्यवस्था करण्यात येत आहे. जटपुरा गेट येथे गणेश मंडळांच्या स्वागतासाठी मंडप व स्टेज उभारणी करण्यात येणार आहे. यांत्रिकी विभागामार्फत वाहन व्यवस्था सांभाळण्यात येत असुन विसर्जन स्थळी लागणारे पिण्याचे



पाणी, फिरते शौचालय कार्यरत ठेवण्यात येणार आहे.

अग्निशमन विभागामार्फत आपत्ती व्यवस्थापन चमु पुर्ण वेळ तैनात राहणार असुन मोठे सर्च लाईट, फिरे अँड रेस्क्यु व्हेइकल, पावर बोट,लाईफ जॅकेट लाईफ सेव्हींग ट्युब्ज , क्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरात २५ कृत्रिम कुंड व १५ निर्माल्य कलश उभारण्यात आले असुन ६१३५ घरघुती मुर्तींचे विसर्जन त्यात केले गेले आहे. मनपाद्वारे केल्या गेलेल्या जनजागृतीने यावर्षीसुद्धा एकही पीओपी मुर्तीचा वापर नागरिकांनी केला नाही.

स्वच्छता विभागाद्वारे रस्त्यांची नियमित सफाई करण्यात येत असुन रस्त्यावर व विसर्जन स्थळी कचरा जमा राहु नये यादृष्टीने घनकचरा संकलनाचे नियोजन करण्यात आले आहे. कृत्रीम तलावातुन निघणारे पाणी,निर्माल्य यांचे पावित्र्य राखून कम्पोस्टिंगसाठी पाठविले जाते तसेच माती ही बगिच्यात वापरण्यात येईल अथवा मुर्तीकारांना वाटप करण्यात येते. ईरई नदी या मुख्य विसर्जन स्थळाची स्वच्छता दररोज केली जात आहे. विसर्जनानंतर त्याच रात्री सर्व रस्ते स्वच्छ करून सकाळी सर्वांना स्वच्छ रस्त्याचा वापर मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांनी मिळतो.

गणेशोत्सवात गणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानग्या या मनपाने सुरु केलेल्या एक खिडकी योजनेद्वारे देण्यात आल्या आहेत. विसर्जन स्थळी गर्दी होऊ नये व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणुन बॅरिकेटिंग लावण्यात आले आहे गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावणाऱ्यांनी मनपाची परवानगी घेऊनच स्टॉल लावावा लागणार असुन त्यांना व्यवस्थेकरिता स्वयंसेवक आणि स्टॉल जवळ पुरेसे डस्टबिन ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे शहरातील घरगुती मूर्तींचे विसर्जन पूर्णपणे घरी अथवा कृत्रिम कुंडातच केले जाणार असुन इरई नदीजवळील विसर्जन कुंडात केवळ मोठ्या सार्वजनिक मूर्तींचे विसर्जन करणाऱ्यांनाच परवानगी असल्याचे मनपाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे.गणेशोत्सव प्रसंगी महानगरपालिकेद्वारे ही सर्व कार्ये दरवर्षी पार पाडली जातात. यावर्षीसुद्धा श्री गणेशोत्सव हा शांततेत व आनंदात पार पाडण्यास सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# शेगावात गणराया पुरस्कारासाठी साकारले प्रबोधनात्मक देखावे

■ स्त्री भ्रूण हत्या, व्यसनमुक्ती : निसर्ग, राष्ट्रहित आदींचा समावेश

■ निरीक्षण समितीकडून झाले गुणांक

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**शेगाव:** जुन्या अनिष्ठ परंपरा मोडीस निघाव्यात, आणि शासनाला अभिप्रेत असलेला गणपती उत्सव विविध उपक्रमांनी साजरा व्हावा यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील शेगावात मोतीबाग सांस्कृतिक मंडळ व नागरी हक्क संरक्षण समिती आणि शासनाच्या सहकार्यांने गणराया पुरस्कार २०२४ साठी यावर्षी रोख ५१ हजार रुपये जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे पुरस्कार मिळण्याकरिता सर्व अधिकृत मंडळांमध्ये चढाओढ निर्माण झाली असून शहरात स्त्रीभ्रूणहत्या, व्यसनमुक्ती, निसर्ग प्रेम, व राष्ट्रहितावर देखावे बनविण्यात आले आहेत. त्यानिमित्ताने रविवारी रात्री पुरस्कार देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या गुणांक समितीने मंडळांना भेटी दिल्यात... शेगावात मोतीबाग तालिम व नागरी हक्क संरक्षण समितीच्यावतीने गणराया पुरस्कार ११ हजार रुपयांपासून सुरू करण्यात आला होता. यावर्षी हा पुरस्कार ५१ हजार रुपयांचा करण्यात आला आहे. हा पुरस्कार लोकसहभागातून गणेश मंडळांना देण्यात येणार आहे. संस्कार व संस्कृती टिकावी हाच उद्देश लोकमान्य टिळकांनी ना देशवासीयांच्या एकत्रिकरणाच्या उद्देशाने सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आज डीजे, लेझर लाईट असभ्य गाणी, नाच यात गुंतला आहे. यातून युवकांनी बाहेर पडून आपले संस्कार व भारतीय संस्कृती टिकावी या उद्देशाने किरणबाप्पू देशमुख यांनी लोकसहभागातून हा गणराया पुरस्कार सुरू केला आहे. या पुरस्कारामुळे आता अनेक मंडळात दहाही दिवस स्वच्छता, विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. शहरातील सार्वजनिक मंडळांनी आपल्या कार्यप्रणालीत बदल करून संस्कार व संस्कृती टिकण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलली आहेत.



हा पुरस्कार एक हाती न ठेवता आयोजकांनी त्याला लोकसहभागाचे स्वरूप देऊन यात पंधरा सदस्यांची निवड समिती तयार केली. समितीमध्ये तहसीलदार, नगर परिषद, पोलिस विभाग, पत्रकार, वकील, डॉक्टर, प्राध्यापक व आयोजन समितीच्या प्रतिनिधीचा समावेश आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांना घेऊन निरीक्षकांची एक चमू तयार करण्यात आली. ही चमू दररोजचा मंडळांच्या निरीक्षणाचा अहवाल प्रामाणिकपणे देत आहेत. यात कुठलाही दुजाभाव न करता पारदर्शकता आहे. सर्वांच्या अहवालानुसार तहसीलदार त्या गुणांची बेरीज करून सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या सार्वजनिक मंडळाची पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे पुरस्कार वितरणातील पारदर्शकता कायम राहणार आहे.

### कोंढव्यात भररस्त्यात वाळू व्यावसायिकावर तीन गोळ्या झाडल्या

**पुणे/प्रतिनिधी :** गणेश विसर्जनाच्या तोंडावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने पुणे पुन्हा एकदा हादरले आहे. शहरामध्ये गणपती उत्सवाची धामधूम सुरू असतानाच वाळू व्यवसायिकावर गोळीबार झाल्याने शहरात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडली आहे. हा हल्ला पूर्व वैमन्यासातून झाला असल्याच प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. पुण्यातील कोंढवा परिसरातील साळवे नगर येथे वाळू व्यावसायिकावर एकच्या सुमारास गोळीबार करण्यात आला. हा हल्ला पूर्व वैमानस्यातून हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप गायकवाड असे वाळू सप्लाय करणाऱ्या व्यावसायिकाचे नाव आहे. कोंढव्यातील साळवे गार्डन समोर गोळीबाराची घटना घडली आहे.

### झारखंडच्या लाडकी बहीण योजनेवर टीका, मग महाराष्ट्राच्या योजनेचे गुणगान कसले गाता? राऊतांचा मोदींना सवाल


**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी झारखंडमधील जमशेदपूरला होते. झारखंड सरकारने महिलांच्या सबलीकरणासाठी 'मुख्यमंत्री मैय्या सन्मान योजना' ही आर्थिक लाभाची योजना सुरू केली आहे. त्यावर मोदी म्हणाले अशा योजना बोगस-भंपक आहेत, बिनकामाच्या आहेत. मग महाराष्ट्रात महायुती सरकार राबवत असलेली लाडकी बहीण योजनेला बोगस भंपक म्हणणार का? दुसऱ्या राज्यात जर कुणी लाडक्या बहिणींसाठी काम केले तर बोगस, भंपकष्ठ मग तोच न्याय महाराष्ट्रात लावला, तर शिंदेंचे सरकार बोगसपणा करतंय नाष्ठ, असा थेट हल्ला शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर केला. त्याचवेळी हे डबल स्टँडर्ड लोक आहेत, अशा शब्दात संतापही व्यक्त केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'वर्षा'वरील पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना निवडणूक तारखा आणि निवडणूक टप्पे यावर भाष्य केले. पत्रकारांशी झालेल्या अनौपचारिक चर्चेत नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात राज्याची विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली.

## प्रहार जनशक्ती संघटनेच्यावतीने दिव्यांगांच्या मागण्यांसाठी
# पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पूर्वसंध्येला आज दिव्यांगांनी शिवाजीनगर येथील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले आहे. शेतमजूर, कष्टकरी आणि दिव्यांग यांच्यावर प्रशासनाकडून होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात लढा पुकारलेला असून संबंधितांना न्याय मिळवून द्यावा, या मागणीसाठी हे आंदोलन सुरू आहे. यावेळी दिव्यांगांनी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख




यांच्या कार्यकाळात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे विशेष महत्त्व होते. त्यादरम्यान मुक्ती संग्राम दिनाच्या दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ हे छत्रपती संभाजी नगर येथे येऊन मराठवाड्यातील विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांच्याशी विविध विषयावर चर्चा करून मुद्दे निहाय भूमिका जाहीर करायचे. परंतु हे सरकार मुंबईतच थातूरमातूर चर्चा करून मुद्दे अंतिम करतात व १६ तारखेला छत्रपती संभाजीनगर येथे येऊन १७ तारखेला ध्वजारोहण झाल्यानंतर घोषणा करून त्यानंतर दुसऱ्या दिवशी मुक्ती संग्राम दिन येईपर्यंत डोकावून सुद्धा मराठवाड्याकडे बघत नाही. मागील वर्षी केलेल्या घोषणांचा आजही त्यांना विसर पडलेला आहे. यामुळे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाने देखील पंधरा तारखेला शहरात येऊन सर्व जिल्हाधिकारी व प्रत्यक्ष सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी आढावा बैठक घेऊनच मराठवाड्याला न्याय देण्याची भूमिका जाहीर करावी, या मागणीसाठी सध्या आंदोलन करत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

# विहिरीचे पात्र लाभार्थी लाभापासून वंचित

## सुकळी येथील प्रकार : चान्नी पोलिसात तक्रार

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** पातूर पंचायत अंतर्गत सुकळी येथे विहिरीचे पात्र लाभार्थी लाभापासून वंचित आहे.ज्या शेतकऱ्यांच्या सातबारावर विहिरीची नोंद आहे.अशा लाभार्थ्यांना देवाणघेवाण करून विहिरीची मंजुरात मिळाली असा आरोप सुकळी येथील शरद वांडे यांनी १५ सप्टेंबर रोजी चान्नी



पोलिसात दिलेल्या तक्रारीतून केला आहे. जवळपास ३० पात्र नसलेल्या लाभार्थ्यांना विहिरीची मंजुरात मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे. विहिरीच्या लाभापासून पात्र लाभार्थ्यांना वगळण्यात आले, सातबारावर विहिरीची नोंद असलेल्या ३० लाभार्थ्यांना विहिरीला मंजुरात कशी मिळाली हा प्रश्न शरद वांडे यांनी उपस्थित केला आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी शरद वांडे यांनी १५ सप्टेंबर रोजी चान्नी पोलिसात दिलेल्या तक्रारीतून केली आहे. यावर काय कारवाई होते. याकडे सुकळी वासियांचे लक्ष लागले आहे.

### विहिरीच्या मंजुरात घोळ प्रकरणाच्या तक्रारीत वाढ !

पातुर पंचायत समिती अंतर्गत अनेक गावात दलालांनी आर्थिक व्यवहार केले व अशाच लाभार्थ्यांच्या विहिरीला मंजुरात मिळाल्या असून, तालुक्यात अनेक गावात विहिरीच्या मंजुरात घोळ प्रकरणाच्या तक्रारीत वाढ झाली आहे.याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेणे गरजेचे आहे.

### अटी व शर्तीचे नियम धाब्यावर

विहिरीचे लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी ग्रामसभा आयोजित करणे आवश्यक आहे. त्यामध्ये निवड केलेले लाभार्थ्यांचे वाचन सुद्धा करणे गरजेचे आहे. परंतु सर्व अटी व शर्तीचे नियम धाब्यावर ठेवून विहिरीच्या मंजुरात करण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप होत आहे.

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित दादा पवार १९ सप्टेंबरला बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली कार्यक्रमस्थळाची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्र्वारूढ पुतळ्यासह शहरातील महामानवांच्या पुतळांचे लोकार्पण आणि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या सन्मानार्थ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अजित दादा पवार हे १९ सप्टेंबरला बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे . या कार्यक्रमस्थळाची पाहणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केली .

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्र्वारूढ पुतळा बुलढाणा शहरातील संगम चौकात उभारण्यात आला आहे या शिवस्मारकासह शहरातीत २६ महामानवांच्या पुतळ्यांचे लोकार्पण तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील माता भगिनींच्या सन्मानार्थ महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे पाटील केंद्रीय मंत्री आणि राज्य सरकारचे मंत्री या कार्यक्रमाला





उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमाच्या पार्श्र्वभूमीवर बुलढाणा येथील विश्रामगृहावर शिवसेना भाजप राष्ट्रवादी युतीच्या घटक पक्षाची आढावा बैठक केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत आज १६ सप्टेंबरला घेतली यावेळी आमदार संजय गायकवाड यांनी १९ सप्टेंबरच्या संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा आणि माहिती उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिली त्यानंतर केंद्रीयमंत्री यांच्यासोबत महायुतीतील घटक पक्षातील पदाधिकाऱ्यांनी स्थानिक शारदा ज्ञानपीठ येथील मैदानावर होणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रम स्थळाची पाहणी केली संबंधित यंत्रणेला काही सूचना यावेळी करण्यात आल्या यावेळी आमदार संजय गायकवाड आमदार संजय रायमुलकर माजी आमदार माजी आमदार शशिकांत खेडेकर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शांताराम दाणे प्रा बळीराम मापारी भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ गणेश मान्टे सचिन देशमुख राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ण्ड नाझेर काजी महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अनुजाताई सावळे शिवसेनेच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के यांच्यासह युतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

## विविध वृत्त...

### तरनोळी शिवारात हातभट्टी दारू अड्ड्यावर पोलिसांचा छापा



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** :गावठी हातभट्टी दारू अड्डयावर पोलिसांनी छापा मारला असून यात रसायनासह मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे. ही कारवाई दारव्हा पोलिसांनी तरनोळी शिवारात केली आहे.

तरनोळी शिवारात गजानन महादेव बोने हा आंबट उग्र वास येत असलेली रसायन तयार करून त्यापासून हातभट्टी तयार करत असल्याची माहिती दारव्हा पोलीस स्टेशन च्या पोलीस कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर दारव्हा पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवशंकर कायंदे यांच्यासह पोहेकॉ महेंद्र भुते, पोकॉ युवराज चव्हाण, पोकॉ अमोल सारोख,पोकॉ पंकज राठोड यांनी तरनोळी येथे छापा मारून मोहाचा सडवा , हातभट्टी दारू, हातभट्टी दारू गाळण्याचे विविध साहित्य असा एकूण.३०४५० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून पंचा समक्ष नष्ट करण्यात आले.दारूबंदी अधिनियमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक पीयुष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी चिलुमुला रजनीकांत, पोलीस निरीक्षक विलास कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दारव्हा पोलिस करीत आहे.

### भगवानबाबा गणेश मंडळ तर्फे रक्तदान व आरोग्य शिबीर



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** दि. १२/०९/२०२४ रोजी पांग्राडोळे येथे संत भगवान बाबा गणेश मंडळ यांच्या पुढाकाराने, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी पार पडले. गावातील ७६ तरुणांनी ऊस्पुर्तपणे रक्तदान केले. सोबतच २०० हुन अधिक रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिरसाठी छत्रपती संभाजीनगर येथील हेडगेवार हॉस्पिटलच्या दत्ताजी भाले रक्तपेढीने व डॉ पांडुरंग मगर पाटिल, डॉ सागर डोळे, डॉ उज्वला गिन्हे या चइइड चऊ डॉक्टरांनी फक्त एक दिवसाच्या पूर्व विनंतीवर त्यांचा अनमोल वेळ देऊन मोलाचे सहकार्य केले. मोफत सुगर तपासणी व औषधी साठी झकउ रायगाव डॉ तनवीर व टीम ने सुद्धा सहभाग घेतला. गावातील डॉ गजानन, डॉ वैभव, डॉ सचिन, डॉ अश्रिवनी यांनी त्यांची जझऊ बंद ठेवून यांनीही सहभाग घेतला. गावातील श्री कृष्ण गणेश मंडळ यांनी रक्तदान मध्ये सहभाग घेतल्यामुळे गावात एक जुटता दिसून आली. रक्तदान मधे तालुक्यातील पिंपळनेर येथील ८ तरुणांनी सहभाग घेतल्यामुळे समाजात रक्तदान विषयी जागृतात दिसून आली. गणेश उत्सवा निमित्त जनसेवेसाठी रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर गावात ठेवल्यामुळे संत भगवानबाबा गणेश मंडळाचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे, मंडळातील अध्यक्ष नितीन, आदिनाथ, ओम, विकास, वैभव, राज, बादशहा, अंकित, समाधान, अजय, विवेक, जय, संस्कार, यश, सचिन, नागेश, दीपक या तरुण मुलांनी दोनच दिवसपूर्वी प्लान केलेले शिबीर यशस्वी होण्यासाठी खूप मेहनत घेतली त्यासाठी गावातील आशा सेविका, सर्व वरिष्ठ, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय क्षेत्रातील मंडळींनी मोलाचे सहकार्य केले.

### उपमुख्यमंत्री अजित पवार आज 'लालबागचा राजा' चरणी लीन; भल्या पहाटे घेतलं दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बाप्पाच्या विसर्जनाला आता अवघे काही तास उरलेले असतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी 'लालबागचा राजा'चं दर्शन घेतलं. अजित पवार नेहमीच सकाळी लवकर आपल्या कामाला सुरुवात करतात. आजच्या दिवसाच्या कामाची सुरुवात अजित पवार यांनी 'लालबागचा राजा'चं दर्शन घेऊन केली आहे. सध्या 'लालबागचा राजा'ला राजाच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी झाली. राजाचं यंदाचं रूप आपल्या डोळ्यात साठवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मुंबईकर 'लालबागचा राजा'च्या दर्शनासाठी दाखल झाले. अशातच अजित पवार यांनी देखील आज सकाळी लालबागचा राजाचं दर्शन घेतलं.

नवसाला पावणारा गणपती अशी 'लालबागचा राजा'ची ओळख आहे. त्यामुळे इथं देशातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपासून ते अगदी सामान्य मुंबईकरांपर्यंत सर्वजण दर्शनासाठी येत असतात. अंबानी कुटुंबीयांपासून ते उपराष्ट्रपती, अनेक केंद्रीय मंत्री यांच्यासह अनेक सेलिब्रिटी देखील दर्शनासाठी येत असतात. अशातच मागील काही दिवसांपासून लाडकी बहीण योजनेमुळे चर्चेत असलेले अजित पवार आज पहाटे साडेसहा वाजताच राजाच्या दर्शनासाठी दाखल झाले.

विसर्जनाला आता केवळ अजून काही तास उरलेले आहेत. त्यामुळे भाविकांची गर्दी लक्षात घेता, 'लालबागचा राजा' विश्वस्त मंडळानं आज पहाटेपासूनच बाप्पाच्या चरणस्पर्शाची रांग बंद केली आहे. तर, राजाच्या मुखदर्शनाची रांग आज रात्री बारा वाजल्यानंतर बंद करण्यात येणार आहे. बारा बारा तास तर काही वेळा संपूर्ण दिवसभर देखील रांगेत उभं राहून राजाचे भक्त बाप्पाच्या चरणी आपलं गाऱ्हाणं मांडतात. आता राजाच्या विसर्जनला अवघे काही तास उरलेले असल्यानं बाप्पाचं शेवटचं रूप डोळ्यात साठवण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक लालबाग परिसरात गर्दी करत असल्याचं चित्र आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ मध्ये कै विरजी भिमजी घेरवरा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तालुक्यातून प्रथम



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ करीता शिक्षण विभागाने नोंदणी करता आवाहन केले . या करता तश्या सुचना गटविकास अधिकारी राजीव शिंदे गटशिक्षणाधिकारी विलास जाधव यांच्या सुचने नुसार अनेक शाळांनी नोंदणी केली . या मध्ये जिल्हापरिषद शाळा १३५व नगरपरिषदेच्या ७ शाळांची नोंदणी खाजगी व्यवस्थापन शाळा एकूण २१० शाळांनी सहभाग घेतला . मागील वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा १ मध्ये कै विरजी भिमजी घेरवरा हाय व कनिष्ठ महाविद्यालयाचा पहिला क्रमांक आला होता . टप्पा क्र २ मध्ये पुन्हा एकदा कै विरजी भिमजी घेरवरा विद्यालया चा पहिला क्रमांक आला . या शाळेने यशाची परंपरा कायम राखली असून सर्वत्र शाळेचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे. या विजया करता प्राचार्य सुरेश निमकर यांचे मार्गदर्शन तसेच सर्व शिक्षक – शिक्षिका कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले . या विजया करता संस्थेचे अध्यक्ष डॉ संदिप दुधे व्यवस्थापक प्रकाश निमकर यांनी अभिनंदन केले . तसेच दुसऱ्या गटातुन जिल्हा परिषद उच्च प्राथ मराठी प्राथ शाळा वागद (तांडा )यांचा पहिला क्र आला या दोनही गटातील प्रथम विजयी शाळेला अनेकांनी जिल्हास्तरीय करता शुभेच्छा दिल्या . तालुक्यस्तरीय तपासणी गट शिक्षण अधिकारी मा विलास जाधव ,विस्तार अधिकारी मा क्रांती खेडकर मॅडम ,केंद्रसमनव्यक मा गणेश राऊत ,मा इथाल मॅडम, मा आडे मॅडम यांनी केली मुख्यमंत्री माझी शाळा ,सुंदर शाळा जिल्हा स्तरीय तपासणी करण्यात आली दरम्यान उत्कृष्ठ असे सांस्कृतिक कार्यक्रम ,हरिपाठ,स्काऊट नवसाक्षरता अभियान उल्हास गीत, महा वाचन प्रसार सेल्फी पॉईंट ,विविध भाजीपाल्या नी नटलेली परस बाग ,अमृत वाटिका, सोलर पॉईंट , लॅब, पोषण आहार, विद्यार्थी शिक्षक अभिलेखे विविध समित्या, अध्ययन क्षमता अश्या विविध बाबीची पाहणी केली व सकारात्मक मार्गदर्शन केले पथक प्रमुख शिक्षण अधिकारी प्राथमिक मा. प्रकाश मिश्रा साहेब, दोन्ही उपशिक्षण अधीकारी मा. नीता गावंडे मॅडम व मा. शिल्पा पोम्पपलीवार मा. धनंजय गव्हाणे साहेब समग्र शिक्षा प्रकल्प प्रमुख हजर होते पंचायत समिती दारव्हा गटशिक्षण अधिकारी कार्यालय तर्फे मा.प्रवीण सोनोने विषयप्रमुख आणि केंद्र प्रमुख मा बिहाडे सर उपस्थित होते

## स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत शरद पवारांचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पत्र

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी त्यांच्या भेटीची वेळ मागितली आहे. शरद पवार यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली. तसेच राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे भेटीची मागणी केली असल्याचेही त्यांनी या पोस्टमध्ये सांगितलं आहे.

शरद पवार यांनी पत्रात नेमकं काय म्हटलं?

महाराष्ट्र राज्यात ३२ लाखाहून अधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. मोठ्या जिद्दीने आणि चिकाटीने अहोरात्र अभ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांची भरती प्रक्रिया वेळेवर व्हावी तसेच वेळेवर नियुक्त्या मिळाव्यात हीच एकमात्र अपेक्षा असते. परंतु सद्यस्थितीत रखडलेल्या नियुक्त्या, अनेक परीक्षांच्या प्रलंबित असलेल्या जाहिराती, परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यास होत असलेला विलंब यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा असंतोष आहे, असं शरद पवार यांनी या पत्रात म्हटलं आहे.

विद्यार्थ्यांच्या मागण्याही मांडल्या

पुढे या पत्रात त्यांनी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्याही मांडल्या आहेत. ऑगस्ट २०२४ मध्ये नियोजित असलेल्या राज्यसेवा परीक्षेच्या दिवशी खइझड परीक्षा येत असल्याने राज्य सेवा परीक्षा पुढे ढकलावी तसेच राज्यसेवेच्या परीक्षेत कृषीच्या २५८ जागांचा समावेश करावा या मागण्यांसाठी पुणे येथे स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. त्यानंतर आयोगाने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आयोगाने अद्यापही परीक्षा नेमकी कधी घेण्यात येईल याबाबत तसेच कृषी सेवेच्या जागांबाबत स्पष्टीकरण दिलेलं नाही. पुढे ऑक्टोबर महिन्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने या संदर्भात त्वरित निर्णय घेण्यात यावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी असल्याचे शरद पवार यांनी म्हटलं आहे.

## पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या १४९९ जन्मदीवस (जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी) निमित्त भव्य रक्तदान शिबिर





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : प्रेषित मोहम्मद यांची जयंती (जश्र्ने ईद-ए-मिलादुन्नबी) किनगाव जट्टु येथे साजरी करण्यात आली जामा मस्जिद ट्रस्ट द्वारा आयोजित सोमवार १६ सप्टेंबर रोजी मस्जिद ट्रस्टच्या वतीने भव्य मिरवणुक काढण्यात आली जामा मस्जिद येथु अनुयाई जमा झाले.व मिरवणुक गावातील विविध रस्त्यांवरुन काढण्यात आली.

जामा मस्जिदचे ईमाम हबिब मोवलाना यांच्या मार्ग दर्शना खाली लहान लहान मुला मुलींनी अजमते मुस्तफा सम्मेलन, नातेपाक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.व ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त ग्रामीण रुग्णालय किनगाव जट्टु येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करुन पैगंबरांना अभिवादन केले.

या शिबिराला किनगाव जट्टु व आसपासच्या गावातील तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी जामा मस्जिद ट्रस्ट किनगाव जट्टु यांनी खुप मोठे योगदान दिले जालना ब्लड बैंकचे बाळासाहेब काठोरे,अक्षय बडे,अशोक सांगळे ,शिल्पा घोडके, डॉ.राठोड, गजानन इंगळे यांनी रक्त संकलनासाठी अथक प्रिरिश्रम घेतले.

## वांद्रे-वरळी सी-लिंकवर शर्यतीच्या नादात भीषण अपघात; BMW व मर्सीडीजच्या धडकेत टॅक्सी उलटली

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईतील वांद्रे-वरळी सागरी सेतूवर भीषण अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. शर्यतीच्या नादात दोन आलिशान गाड्यांनी एका टॅक्सीला धडक दिली आहे. या अपघातात मोठी वित्तहानी झाली आहे. तसेच टॅक्सीमधून प्रवास करणाऱ्या कुटुंबातील चार सदस्य व टॅक्सीचालक जखमी झाला आहे. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही. दरम्यान,या अपघाताप्रकरणी दोन्ही आलिशान गाड्या चालवणाऱ्या इसमांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टॅक्सीमधून लहान मुलासह एका कुटुंबातील चार सदस्य प्रवास करत होते. या अपघातात सुदैवाने त्यांचा जीव बचावला, मात्र ते जखमी झाले आहेत.

वांद्रे-वरळी सागरी सेतूवर बीएमडब्ल्यू व मर्सिडीज चालकांनी शर्यत लावली होती. दोघेही वाऱ्याच्या वेगाने आपापल्या कार चालवत होते. काही अंतर पुढे गेल्यावर समोर एक टॅक्सी होती. त्याचवेळी या दोन्ही कारचालकांचं कारवरील नियंत्रण सुटलं. या दोन्ही आलिशान गाड्यांनी टॅक्सीला धडक दिली. कार पूलावरच उलटली. सुदैवानी टॅक्सीमधील प्रवासी वाचले. वरळी पोलिसांनी लगेच घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोन्ही गाड्या जप्त केल्या. तसेच मर्सिडीज व बीएमडब्ल्यू चालकांना अटक केली आहे.

## तळेगावात अनोख्या पद्धतीने हिंदु-मुस्लीम ऐक्याचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : तालुक्यातील तळेगाव हे ५हजार लोक संख्येचे मोठे गाव आहे.या गावात सुमारे ६० टक्के हिंदु व इतर तर ४० टक्के मुस्लीम बांधव गुण्यागोविदांने राहतात.हिंदू व मुस्लिम बांधव एकोप्याने राहावे यासाठी येथील गणेश मंडळाने ईद कमिटी चे स्वागत केले तर ईद कमिटीने गणपती बाप्पांना पुष्पहार घालून,गणेश मंडळाचे स्वागत करून अनोख्या पद्धतीने हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडविले आहे.

या वर्षी गणेश उत्सवात ईद ए मिलाद चा सण आला, सोमवार दि. १६ सप्टेंबर रोजी निघणा-या ईद च्या मिरवणुक मार्गावर सार्वजनिक मंडळाचा गणपती असल्याने पेचप्रसंग निर्माण होऊ नये.यासाठी शांतता कमिटीच्या बैठकीत हिंदु व मुस्लीम धर्मीय प्रमुखांनी पुढाकार घेत एकोप्याने दोन्ही सन साजरे करू असे आश्र्वासन ठाणेदार यांना दिले आहे. सोमवारी सकाळी ईद ची मिरवणुक सार्वजनिक गणेश मंडळाजवळ पोहचताच गणेश मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्र्वर खोडे व इतरांनी ईद कमिटीच्या



पदाधिकारी याचे पुष्पगुछ देवुन स्वागत केले.

तर ईद कमेटी तर्फे ठाणेदार विलास कुलकर्णी यांनी सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणपतीची पुष्पहार घालुन पुजा केली. तर ईद कमेटी तर्फे अबरार खान, नासीर टेलर व इतरांनी गणेश मंडळाच्या पदाधिका-यांना पुष्पगुछ देवुन शुभेच्छा दिल्या.या निमीत्यांने तळेगाव मध्ये हिदु मुस्लीम ऐक्याचे अनोखे दर्शन ठाणेदार विलास कुलकर्णी यांनी घडवुन आणले.या वेळी दोन्ही समुदाय मध्ये अनोखा उत्साह बधावयास मिळाला.

ही अनोखी संकल्पना पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक पियुष जगताप,सहा. पोलीस अधिक्षक दारव्हा चिलुमुला रजनीकांत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास कुलकर्णी, पोउपनि धनंजय रत्नपारखी, पोहवा पुरूषोत्तम बोबडे, पोहवा महेद्र भुते, पोकों पंकज राठोड, युवराज चव्हाण, पोना सुरेश राठोड यांनी अमलात आणली.